# महाराष्ट्र शासन

क्र.मअसे/२०१६/३२-एफ/६५५
दूरध्वनी: २६६७७५५५
फॅक्स : २६६६०२८७
Email : supdt@mahafireservice.gov.in
Website: www.mahafireservice.gov.in

**अग्निशमन सल्लागार यांचे कार्यालय**
महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी,
विद्यानगरी, हंस भुग्रा मार्ग,
सांताक्रूझ-पूर्व, मुंबई-४०० ०९८.
दिनांक : २६ एप्रिल,२०१६

विषय: महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमीचा "उप स्थानक अधिकारी आणि अग्नि प्रतिबंधक अधिकारी अभ्यासक्रम" (Sub-Officer & Fire Prevention Officer Course) उत्तीर्ण होणाऱ्या उमेदवारांना शासकीय/निमशासकीय/ सार्वजनिक उपक्रम/ महानगरपालिका/ नगरपरिषदा/ नगर पंचायती/ विशेष नियोजन प्राधिकरणांच्या अग्निशमन सेवेत अग्निशमन केंद्र अधिकारी/सहाय्यक अग्निशमन केंद्र अधिकारी/ उप अग्निशमन अधिकारी/ अग्निशमन अधिक्षक व तत्सम पदावर नियुक्त करण्याबाबत

## प रि प त्र क

राज्यातील महानगरपालिका/नगरपरिषदा व विशेष नियोजन प्राधिकरणांच्या अग्निशमन विभागातील उप अग्निशमन अधिकारी, सहाय्यक अग्निशमन केंद्र अधिकारी तसेच अग्निशमन केंद्र अधिकारी या पदावर नियुक्ती करताना केवळ राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय, नागपूर यांचा ६ महिने कालावधीचा अनुक्रमे उप स्थानक अधिकारी पाठयक्रम (Sub Officer Course), केंद्र अधिकारी व प्रशिक्षक पाठयक्रम (Station Officer & Instructor's Course), विभागीय अग्निशमन अधिकारी पाठयक्रम (Divisional Fire Officer Course) उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांचा विचार केला जातो. कारण देशात अग्निशमन अधिका-यांचे प्रशिक्षण देणारी एकमेव शासकीय महाविद्यालय होते.

०२. मात्र, महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम,२००६ हा राज्यात दिनांक ६ डिसेंबर,२००८ पासून लागू करण्यात आला आहे. तसेच या अधिनियमाची अंमलबजावणी करण्यासाठी महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना नियम,२००९ हे दिनांक २३ जून,२००९ पासून अंमलात आले आहेत. अग्निशमन अधिनियम,२००६ च्या कलम १९ (नऊ) अन्वये अग्निशमन दलामध्ये सेवेत असलेले तसेच खाजगी क्षेत्रातील विविध उद्योग, वाणिज्यिक व व्यापारी आस्थापना यांच्या गरजा भागविण्यासाठी आणि त्यांच्या अधिकाऱ्यांना किंवा कर्मचारी वर्गाला प्रशिक्षण देण्याकरिता किंवा त्यांना प्रशिक्षित व अर्हताप्राप्त अग्निशमन सेवा कर्मचारीवर्ग पुरविण्यासाठी शासनाने महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी सन २०१२ साली प्रस्थापित केली असून या अकादमीतर्फे १ वर्ष कालावधीचा "उपस्थानक अधिकारी आणि अग्नि प्रतिबंधक अधिकारी (Sub-Officer & Fire Prevention Officer Course) पाठयक्रम सुरु केला आहे. या पाठयक्रमात राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय, नागपूर येथील ६ महिन्याचा अभ्यासक्रमाबरोबर अग्निशमन अधिनियम,२००६, अग्निशमन नियम,२००९ तसेच भारतीय राष्ट्रीय इमारत संहिता,२००५ ची अंमलबजावणी करणे हे देखील समाविष्ट आहे. याशिवाय माहिती व तंत्रज्ञान, दुर्घटनेचा अभ्यास

करुन त्याचे अन्वेषण करुन कशामुळे दुर्घटना घडली, अग्निशमन सेवा प्रशासन व्यवस्थापन इ. विषय उमेदवारांना शिकवले जातात. त्यामुळे राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय, नागपूर येथील सब-ऑफिसरचा अभ्यासक्रम उत्तीर्ण होणा-या उमेदवारांबरोबर महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमीचा "उपस्थानक अधिकारी आणि अग्नि प्रतिबंधक अधिकारी" हा परिपूर्ण पाठयक्रम उत्तीर्ण होणारे उमेदवार अग्निशमन सेवेतील अधिकारी पदावर नियुक्त होण्यास आणि आपले कर्तव्य पार पाडण्यास पात्र ठरतात.

०३. तसेच आपण हेही लक्षात घेणे आवश्यक आहे की, राज्यातील महानगरपालिका/ नगरपरिषदांमध्ये अग्निशमन सेवेचे सक्षमीकरण करण्यासाठी महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियान राबवण्याबाबत नगर विकास विभाग शासन निर्णय क्र.अशस १४०७/३६०/प्र.क्र.२११/नवि-२० दि.३१ ऑगस्ट,२००९ शासनाने निर्णय घेतला असून सदर निर्णयाच्या परिच्छेद (II) अग्निशमन सेवेतील कार्यरत मनुष्यबळाचे सक्षमीकरण (Capacity Building) नुसार या संचालनालयामार्फत नागरी स्वराज्य संस्था व विशेष नियोजन प्राधिकरण यांचे अधिकारी व कर्मचारी यांना तसेच अग्निशमन सेवा संचालनालयामध्ये कार्यरत असणाऱ्या मनुष्यबळास औद्योगिक क्षेत्राच्या विकासामुळे रासायनिक व ज्वालाग्राही पदार्थामुळे वाढलेल्या आगीचे धोके लक्षात घेऊन त्यासाठी आवश्यक असलेले **प्रशिक्षण देण्याची सांविधीक जबाबदारी ही अग्निशमन अधिनियम,२००६ च्या कलम ३० नुसार महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमीची असून त्यानुसार सदर अकादमीतर्फे आतापर्यंत ८३ उपस्थानक अधिकारी आणि अग्नि प्रतिबंधक अधिकारी उत्तीर्ण झाले असून सध्या अनेक उमेदवार प्रशिक्षण घेत आहेत. अशा प्रशिक्षित उमेदवारांना महानगरपालिका/ नगरपरिषदा/विशेष नियोजन प्राधिकरणे/शासकीय/निमशासकीय कार्यालयाच्या अग्निशमन दलात अधिकारी पदावर नियुक्ती देण्यासाठी अग्रक्रमाने विचार करणे आवश्यक आहे.**

०४. तथापि असा अभ्यासक्रम उत्तीर्ण झालेल्या काही उमेदवारांनी सार्वजनिक उपक्रमाच्या अग्निशमन दलात सब ऑफिसर वा तत्सम पदावर नियुक्ती मिळण्यासाठी अर्ज केला असता या पदांवर केवळ राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय, नागपूर येथील सब ऑफिसर पाठयक्रम उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांचा विचार केला जातो. परिणामी या अकादमीतील अद्ययावत व प्रगत पाठयक्रम उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना सेवेच्या संधी उपलब्ध होण्यात अडचण होत असल्याबद्दल या कार्यालयाच्या निदर्शनास आले आहे.

०५. यासंदर्भात मा.श्री.ह.मा.जावळे, विधान सभा सदस्य यांनी सन २०१५ च्या पावसाळी अधिवेशनात *"महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालयाचा उपस्थानक अधिकारी व अग्नि प्रतिबंधक अधिकारी अभ्यासक्रम उत्तीर्ण झालेले उमेदवार नोकरीच्या प्रतिक्षेत असून राज्यातील अनेक नगरपालिका व महानगरपालिकेमध्ये रिक्त जागा असून राज्यात विविध ठिकाणी आग लागण्याच्या घटना घडत असल्यामुळे अग्निशमन सेवेतील रिक्त पदे तात्काळ भरावीत"* असा औचित्याचा मुद्दा उपस्थित केला होता. त्याबाबत शासनाकडून सक्रिय प्रतिसाद देण्याची नितांत आवश्यकता लक्षात घेऊन या कार्यालयातर्फे राज्यातील अ, ब, क व ड वर्ग महानगरपालिकांच्या अग्निशमन सेवेतील अधिकारी/कर्मचारी संवर्गातील पदांसाठी सामाईक आदर्श सेवा प्रवेश नियम तयार केले असून त्यामध्ये सदर अभ्यासक्रम विहित केला आहे. सबब, या परिपत्रकाद्वारे सर्व शासकीय/निमशासकीय/ सार्वजनिक उपक्रम/महानगरपालिका/नगरपरिषदा/नगर पंचायती/विशेष नियोजन प्राधिकरणांना सुचित

करण्यात येते की, त्यांना आपल्या अग्निशमन दलातील अग्निशमन केंद्र अधिकारी/सहाय्यक अग्निशमन केंद्र अधिकारी/उप अग्निशमन अधिकारी/अग्निशमन अधिक्षक व तत्सम पदाच्या सेवा प्रवेश नियमात महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमीचा ‘‘उपस्थानक अधिकारी व अग्नि प्रतिबंधक अधिकारी पाठयक्रम’’ उत्तीर्ण ही अर्हता विहित करावी व त्यानुसार अग्निशमन सेवेतील पदभरती प्रक्रियेचा अवलंब करावा.

कृपया परिपत्रक प्राप्त झाल्याची पोच द्यावी.

**(एस.एस.वारीक)**
संचालक
महाराष्ट्र अग्निशमन सेवा

**प्रति,**

मा.सचिव-२, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
आयुक्त, सर्व महानगरपालिका,
आयुक्त तथा संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई - ४०० ०३०.
महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, वान्द्रे (पू), मुंबई - ४०० ०५१.
मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, अंधेरी (पू), मुंबई - ४०० ०९३.
व्यवस्थापकीय संचालक, सिडको, निर्मल बिल्डींग, नरीमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२१.
महानगर आयुक्त, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे.
मुख्य कार्यकारी अधिकारी, पिंपरी-चिंचवड नवनगर प्राधिकरण, पुणे.
इतर विशेष नियोजन प्राधिकरणे (म्हाडा, नागपूर सुधार प्रन्यास, मिहान, इत्यादी).
सर्व जिल्हाधिकारी (मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून).
सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषद / नगरपंचायती.